सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)
विद्यार्थी विकास मंडळ
गणेशखिंड, पुणे – ४११ ००७

डॉ. प्रभाकर देसाई
एम्.ए., पीएच् डी.
संचालक

संदर्भ क्र. विविमं/२०१७–१८/४४८ दिनांक : १३/११/२०१७

## बैठकीच्या ठिकाणातील बदल

प्रति,
मा. प्राचार्य/मा. संचालक,
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्न असलेली **पुणे शहरातील**
सर्व महाविद्यालये व मान्यताप्राप्त संस्था.

**विषय** : **दिव्यांगांचे मानसिक संतुलन व मानसिक विकलांगता या अनुषंगाने विशेष बैठकीच्या ठिकाणातील बदल.**

**संदर्भ क्र.** : १. मा. आयुक्त अपंग कल्याण आयुक्तालय, ३ चर्च पथ, महाराष्ट्र राज्य, पुणे ०१ यांचे अकआ/माआका/पुणे/२०१७, दि. ३१ ऑक्टोबर, २०१७ चे पत्र.
२. या विभागाचे विविमं/२०१७–१८/४४०, दि. १०/११/२०१७ चे पत्र.

महोदय/महोदया,

उपरोक्त संदर्भिय विषयास अनुसरून आपणास कळविण्यात येते की, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ विद्यार्थी विकास मंडळ व राष्ट्रीय सेवा योजना आणि मा. आयुक्त अपंग कल्याण आयुक्तालय, ३ चर्च पथ, महाराष्ट्र राज्य, पुणे ०१ यांच्या संयुक्त विद्यमाने 'दिव्यांगांचे मानसिक संतुलन व मानसिक विकलांगता' या विषयावर दिनांक १४ नोव्हेंबर, २०१७ रोजी सकाळी ०९.०० वाजता विद्यार्थी विकास मंडळ परिसरातील सभागृह (महामहोपाध्याय दत्तो वामन पोतदार संकुल), सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे येथे डॉ. नितिन करमळकर, मा. कुलगुरु यांचे अध्यक्षतेखाली व नितिन पाटील, मा. आयुक्त अपंग कल्याण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या प्रमुख उपस्थितित सदर बैठक संपन्न होणार आहे.

सदर बैठकीच्या विद्यार्थी विकास मंडळ कार्यालयासमोरील सभागृह (महामहोपाध्याय दत्तो वामन पोतदार संकुल सभागृह या **पूर्व नियोजित ठिकाणात बदल करण्यात येत असून मंगळवार, दिनांक १४ नोव्हेंबर, २०१७ रोजी सकाळी ०९.०० वाजता सदर बैठक संत नामदेव सभागृह, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ** येथे आयोजित करण्यात आली असून संबंधितानी याची नोंद घ्यावी.

संचालक (अतिरिक्त कार्यभार)
विद्यार्थी विकास मंडळ